
# गोंदण

## आणि इतर कथा



शुभदा कर्णिक

# गोंदण

## आणि इतर कथा

शुभदा कर्णिक

अनौपचारिक शिक्षण साधनकेंद्र, महाराष्ट्र,

**इंडिअन इन्स्टिट्यूट ऑफ एजुकेशन**

जे. पी. नाईक पथ, १२८/२, कोथरूड, पुणे ४११ ०२९.

# प्रस्तावना

इ. स. २००० पर्यंत अनेक प्रकारच्या साथींच्या रोगांचे निर्मूलन करण्याचा आपण संकल्प केलेला आहे. गेल्या काही वर्षात हिवताप व देवीसारख्या साथींना पायबंद घालण्यात आपण पुष्कळसे यशस्वी ठरलेले आहोत.

अजूनही कॅन्सर, कुष्ठरोग व नव्यानेच लक्षात आलेल्या एड्स ह्या रोगांमुळे पुष्कळ लोक दगवतात.

कुष्ठरोगाबद्दलचे अज्ञान व गैरसमजुती ह्यामुळे कुष्ठरोग अजुनही आटोक्यात आला नाही. तसेच माणसाच्या अंगातील रोगप्रतिकारक शक्ती नष्ट करणारा एड्स हा रोग काय आहे, ह्याची लोकांना फारशी कल्पना नाही.


म्हणून, 'गोंदण आणि इतर कथा' ह्या पुस्तकेतील सहा कथांमधून ह्या रोगांची माहिती, त्याबद्दलच्या गैरसमजुती, उपचार व प्रतिबंधक उपाय सोप्या भाषेत नववाचकांसमोर मांडत आहोत. ह्या पुस्तिकेचे स्वागत होईल, अशी अपेक्षा आहे.

**चित्रा नाईक**

# गोंदण

गोंदण करायचं का बाई गोंदण. देवाचं काढा. फूल काढा. पानाच करा. नावाचं करा - गोंदण करणारी आली हो बाई.

हिरणी गावातली वडारीण ओरडत फिरत होती. अनेक लहान पोरी वडारणीजवळ जमल्या. चिमुकली लताही आली.



तिने आईला सांगितले, "आये मला पण तुझ्या हातावर आहे तसं गोंदवण करायचं."

लताची आई शांता वडारणीला म्हणाली, "अग बाई, माझी पोर लहान आहे. लहानसं फूल तिच्या हातावर गोंदवून दे. अगदी हलका हात ठेव बाई. दुखवू नकोस."

"होय ग बाई. बेस करून देते बघ मी." असं सांगून वडारणीने गोंदण सुई व सामान काढलं. तिने लताचा हात धरला आणि इवलंसं फूल गोंदवलं.

"आताच पलीकडची वाडी हाये, तिथं एका माणसाला मोठं गोंदण करून आले माई" .... वडारीण सामान पिशवीत घालताना सांगत होती.

लता थोडी रडली. पण चार दिवसानी हातावर गोंदवलेलं सुकून छान दिसू लागलं. तिला आनंद झाला.

परंतु गोंदण सुईमधून एका भयानक रोगाचे जंतू लताच्या शरीरात शिरले हे कुणालाच कळले नाही. सात वर्ष लताचे चिमुकले शरीर तो रोग पोखरत होता तिची रोगप्रतिकारशक्ति कमी कमी होत होती.

लताला अकरावं वरीस लागलं आणि ती सारखी आजारी पडू लागली. डॉक्टरांनी वेगवेगळी औषधे दिली. पण गुण आला नाही. ती खंगतच चालली. तिचे रक्त तपासून घेतले आणि देशमुख डॉक्टर फार घाबरले. कारण एड्स रोगाचे एच. आय. व्ही. नावाचे जंतू तिच्या रक्तात आढळून आले.

ह्याच जंतूमुळे लताची रोग प्रतिकार करण्याची ताकद नाहीशी झालेली होती. पण कसे आणि कुठून गेले ह्या भयानक एड्स रोगाचे जंतू लताच्या शरीरात?

लताच्या आईवडिलांचे रक्त तपासले. पण ते दोघेही निरोगी होते. डॉक्टरांना काही सुचेना. आजारी लताच्या हातावरचे गोंदलेले फूल त्यांनी पाहिले.

"अरेरे ही लहान मुलगी, हे सुंदर फूल आता कोमेजून जाईल!" देशमुख डॉक्टरांना फार वाईट वाटले. ते लोकांना सांगू लागले.

''लताला एड्स रोग झालेला आहे. पण एड्स सहजपणे होणारा रोग नाही. साथीचा रोग नाही. एकमेकाच्या स्पर्शाने किंवा सहवासाने होत नाही. आईकडून मुलीला आला म्हणावे, तर तिच्या रक्तात हे जंतू नाहीत.''



''लताला कधी बाहेरचे रक्त दिलेले आठवत नाही. अशा रक्तातून कधी कधी एड्सचे जंतू शरीरात जाऊ शकतात. होय, इंजेक्शनच्या सुईतूनही हे जंतू शरीरात जाण्याची शक्यता असते. कारण एका माणसाला इंजेक्शन दिलं की सुईला त्याचे थोडेसे रक्त लागते. ते दिसतही नाही. त्या माणसाच्या शरीरात एड्सचे जंतू असतील आणि तीच सुई न धुता परत दुसऱ्या माणसाला इंजेक्शन देताना वापरली तर पहिल्या माणसाचे जंतू दुसऱ्याच्या रक्तात मिसळून वाढतात. खूप वर्षांनी हा रोग आपले दुष्ट रूप दाखवू लागतो. पण हिला इंजेक्शने तर अलीकडेच दिली आहेत. मग काय कारण असेल बरे?''

देशमुखांचे लक्ष हातावरच्या गोंदणाकडे गेले व ते एकदम म्हणाले, 'लोकांनो, कदाचित वडारणीने गोंदणाची सुई उकळवून निर्जंतुक केलेली नव्हती. त्यातूनच हा मारेकरी लताच्या कोवळ्या शरीरात शिरलेला आहे असे वाटते."

''पण डॉक्टरसाहेब ह्या एड्स रोगावर औषध असेलच ना -'' कुणीतरी विचारले.

" नाही रे बाबांनो, एड्स वर अजून जगात कुठलेही औषध तयार उपचार सापडलेले नाहीत. मरणानेच आजारातून सुटका होते. लोकांना समजावून सांगितलेच पाहिजे. आता गोंदण करून घेऊ नका. मुलामुलीचे कान टोचताना सुई उकळवून निर्जंतुक करून घेत जा.

खेडेगावात माणसे न्हाव्याकडून दाढी करून घेतात. एकाची झाली की दुसरा अशी चार-पाच लोकांची दाढी करताना एकच वस्तरा न्हावी वापरतो. एकाला जखम झाली तर त्याचे रक्त दुसऱ्याला लागते. ती काळजी घेणे फार जरूरीचे आहे. एड्सचे एच. आय. व्ही. जंतू एकात असले तर दुसऱ्याला भोवतात. एड्सबद्दल लोकांना माहिती देऊन जागरूक करणे हाच उपाय आहे. दुसरा नाही."

बिचारी लता बळी पडली. कोमल फूल सुकून गेले.

देशमुख डॉक्टर गावातल्या लोकांना एड्सची माहिती देत असतात. एड्स रोग कसा होतो त्याचे फलक दवाखान्यात लावले आहेत.

''एड्स रोगाची सगळी कारणे समजून घ्या. माहितीसाठी दवाखान्यात या. लोकशिक्षण एवढाच उपाय आहे. सावध रहा. जागरूक रहा.'' ○

# अपघात

"आबा, लवकर चला यशवंत व संजयला अपघात झाला आहे.

काय झाल पाटील?

बायजाबाईने संजयच्या आईने घाबरून विचारले.

"काळजी करू नका बाई. दोघानाही सरकारी दवाखान्यात नेलेले आहे" - पाटिलानी सांगितले. आबा आणि बायजाबाई घाईने मुलांकडे गेले.



यशवंत व संजय आबांची मुले. यशवंत बारावीत शिकत होता. तो सायकलवरून कॉलेजात जात असे. आज यशवंताने धाकट्या भावाला संजयला डबलसीट नेले होते. पण एका ट्रकने सायकलला धडक दिली. दोघेही धाडकन उडून आपटले. संजयला जबर मार लागला होता. यशवंताही जखमी झाला. खूप रक्त गेले होते.

"काकू कुष्ठरोग होणे देवाचा कोप आहे ही समजूत चुकीची आहे. काकांनी पीडिताची सेवा केली म्हणून देवाने त्यांचा आजार लवकर कळून येण्याची कृपा केली अस समजा."

"अरे पण बाबाना कुष्ठरोग का झाला?" रघूही विचारू लागला.


"आता माझी हातापायाची बोटं झडतील. माझी मुलं मला दूर ठेवतील. नको नको हे जगणं." काका दुःखाने म्हणाले. "मी स्वच्छ रहातो. आमची जात चांगली आहे. मग मला हे दुखणं का झालं?"



"रघू, काकांनी ज्या माणसाची आजारात सेवा केली तो कुष्ठरोगी असावा. खरं तर ९५ टक्के रोगी संसर्गजन्य नसतात. पण प्राथमिक अवस्थेत दहा टक्के लोकांच्या महारोगात थुंकीतून जंतू पसरू शकतात, तसा तो माणूस होता. तेवढं आणि रघू, वाईट झालं खरं!" दीपकने समजावून सांगितले. तो पुढे म्हणाला,

"जातीपातीवर काहीच नसतं. बायका, पुरुष, गरीब पैसेवाले किंवा कुठल्याही जातिधर्मातल्या माणसाला कुष्ठरोग होऊ शकतो आणि इतर रोगाप्रमाणे औषध घेऊन तो पूर्ण बरा होतो."

"माझ्या मुलानातवंडांना कुष्ठरोग होईल की काय? घाबरून काकांनी विचारले. "नाही काका, कुष्ठरोग आईबापांकडून मुलांना होणारा असा आनुवंशिक रोग नाही. दमा, मधुमेह हे रोग असे असतात. पण कुष्ठरोग तसा नाही.



"मी मुलामाणसांत रहायचं का दूर राहू? काका दुःखाने म्हणाले?"

"काका आता असलं काहीच करावं लागत नाही. सगळे लोकांचे गैरसमज आहेत."

"माझी हातापायाची बोटं झडणार नाहीत? मी विरूप होणार नाही?"

काका "लवकर औषधपाणी केलं तर असं काही होत नाही. ती फार पुढची अवस्था आहे. लोक महारोग झाला असं कळलं की फार घाबरतात. डॉक्टरकडे जाऊन औषध घेत नाहीत. रोग लपवून ठेवतात म्हणून आजार वाढतो." दीपकने सांगितले.

"पण मला कळलं कसं नाही?" काका.

"सुरुवातीला कुठे दुखत नाही आणि संवेदना कमी होते.

मग कसं कळणार?" दीपक.

"पण ही बधिरता कशामुळे येते?"

" रघू,माणसाच्या शरीरात संवेदना जाणवणाऱ्या नसा असतात. मज्जातंतूचा स्पर्शज्ञान जाणवणारा जो भाग असतो तो कुष्ठरोग जंतूंमुळे निकामी होतो. मग भाजलं,लागलं,जखम झाली तरी कळत नाही. म्हणून विरूपता येते."

"पण समाजात कुष्ठरोगाला भयानक समजतात व रोगींना वाळीत टाकतात. मी आता गावकऱ्यांना चित्रफिती दाखवून त्यांचे सगळे गैरसमज काढून टाकतो. समाजातील वेडी समजूत असल्यामुळे लोक रोग लपवतात. पण तुम्ही घाबरू नका. औषध घ्या आणि लवकर बरे व्हा." शांतपणे दीपक काकांना समजावू लागला.

१८२३५

"दीपक, तुझा फार आधार वाटतो. बरं झालं, डॉक्टर होऊन तू येथे गावातच रहाण्याचं ठरविलंस. मी बाबांना घरी ठेऊन बरं करीन." रघू दीपकचा हात धरून म्हणाला, "होय अशा लोकांना मायेचा आधार देणं जरूरीचं असतं. तुझे बाबा चांगले बरे होतील. नेमाने औषध घ्या."

आता रामूकाका बरे होत आहेत.

# एकमेका सहाय्य करू अवघेचि धरू सुपंथ

गावातले लोक बायका व मुले डॉक्टर दीपकने आणलेली चित्रफीत पहात होती.

''हे पहा गांधीजी! कुष्ठरोगीच्या जखमा धूत आहेत.'' एक मुलगा ओरडला.



''गांधीजी थोर होते. त्यांनी लोकांना धडा घालून दिला की कुष्ठरोग वाटतो तसा भीतिदायक नसतो. त्यांना हात लावला, शिवलं तरी काही होत नाही.'' डॉक्टर म्हणाले.

''दीपकदादा, ही जागा कुठली? इथे तर कुष्ठरोगी वेगवेगळी काम करताना दिसत आहेत.''

“हे बाबा आमटे. यांनी कुष्ठरोगींवर उपचार करण्याकरता बसविलेले हे ‘आनंदवन’ आहे. इथे डॉक्टर अशा लोकांचे झडलेले अवयव ऑपरेशनने ठीकठाक करून त्यांचे रूप सुधारतात. उपचार घेत असताना हे लोक कामही करतात.” दीपक सांगू लागला.



“पण अशा हातांनी कुष्ठरोगी काम कसे करू शकतात?”

“इतरांसारखी सगळी कामे कुष्ठरोगी करू शकतात. उपजीविकेसाठी कुणावरही अवलंबून रहात नाहीत. त्यामुळे त्यांच्या मनावर दुखण्यामुळे झालेला वाईट परिणामही नाहीसा होतो. ते लोक आनंदी रहातात, व लवकर बरे होतात. इकडे पहा हा माणूस लोखंडी सामान बनवितो. इथे बायका साड्या, सतरंज्या, टॉवेल. विणतात. कुणी शेती फळबागांत काम करतात तर काही लोक डेअरी चालवतात.”

"पण कुष्ठरोगींनी तयार केलेली वस्तू वापरली तर चालते का?"

"अरे ही गैरसमजूत मनातून काढून टाका. नुसत्या संसर्गाने कुष्ठरोग होत नाही. फक्त १० टक्के लोकांचा रोग लागण्याची शक्यता असते. आणि थुंकीतून किंवा खोकल्यातून रोगाचे जंतू पसरतात. पण वेळीच समजले व औषधे घेतली तर कुष्ठरोगी पूर्ण बरा होतो. त्यांना दूर ठेवावे लागत नाही." दीपकने सांगितले.



"असे आहे तर आमच्या सर्व गैरसमजुती आता नाहीशा झाल्या. आम्ही कुष्ठरोगींना मदत करू" असे गावकरी आपसात बोलू लागले.

तेवढ्यात कुठून तरी गलका ऐकू आला. "सदू पाटलाकडे मुलीचं लगीन आहे. नवऱ्याकडचं वराड आलं की काय ?" लगबगीने जात हौसाबाई बोलल्या.

सगळे लोक तिकडे धावले."अग का ग मारतेस लेकीला?" हिरवा चुडा घातलेली राधी रडत होती. तिला सारजाबाई दणके घालीत होती. राधीला हौसाबाईने सोडवून जवळ घेतली.

"अहो हिला आधी हे लगीनच नको होतं. त्या किसनशी लगीन करायचं होतं राधीला! पण आमी चांगलं पैसेवालं घर शोधलं. परवा लगीन म्हणून मांडव घातला आणि आता सांगावा आला की ते लोक लगनाला तयार नाहीत.लगीन मोडलं." पाटील म्हणाले.



"अहो पण का?" सरपंचानी व गावकऱ्यांनी विचारले.

"आमच्या भावाला कुष्ठरोग झालेला कळला. आता कोण लगीन करणार राधीसंगं?"

"किसन गरीब म्हणून तुम्ही त्याला नको म्हटलं ही चूक केली. कायरे किसन, तुझी तयारी आहे का राधीशी लगीन करायची? तिच्या काकाला कुष्ठरोग आहे." सरपंचांनी विचारले.

"काकाला कुष्ठरोग आहे तर काय झालं? राधीला तर नाही आणि असता तरी मी तिच्याशी लग्न केलंच असतं. दीपकदादाने आता शिकवलंय की कुष्ठरोग दुसऱ्या रोगांसारखाच औषधाने बरा होतो." किसनने जोरात सांगितले.

"बघा पाटील, गावातला चांगला मुलगा गरीब म्हणून नाकारलात. आता तो आमचा मुलगा. तुमची दोन एकर जमीन त्याला देऊन जावई करून घ्या. गुणी मुलगा आहे. दुसऱ्या गाववाल्यांना पण धडा शिकवला पाहिजे." सरपंच म्हणाले.

सगळ्या गावकऱ्यांना आनंद झाला. "पाटील तुमचा भाऊ बरा होऊन आला की त्याला शेती करायला दिली पाहिजे. नीट वागवलं पाहिजे. ही आमची अट आहे." सरपंच परत बोलले.

"सगळं कबूल आहे. साहेब चुकलो आम्ही. पोरीचं लगीन तेवढं पार पाडा." पाटील म्हणाले. किसन राधीचं लगीन झालं. गावकरी आनंदाने म्हणाले "दीपक दादाने सगळ्याना शहाणं केलं. गावाचं भलं केलं." "हो पण आता कुणाला संशय येण्यासारखा डाग अंगावर दिसला की तपासून घ्या. लपवून ठेऊ नका. ह्यागत करू नका" दीपक म्हणाला "दीपक तू डॉक्टर होऊन गावात राहिलास त्यामुळे गाव स्वच्छ झालं. लोक सुधारले. तुझा आम्हाला आभिमान वाटतो." सरपंच आनंदाने म्हणाले.

○ ○ ○